# उजेडी राहिले, उजेड होऊन !

लहानपणची एक आठवण माझ्या मनात घर करून आहे. आईबरोबर देवळात जाऊन संध्याकाळी घरी परतलो होतो. पाहिलं तर घराला कुलूप. तेवढ्यात दिवे गेले आणि गुडूप अंधार पसरला. पलीकडच्या घरातून चावी आणायची होती. मी आणि माझी दीड-दोन वर्षांनी मोठी बहीण धडधडत्या छातीने ती थोडीशी पावलं गेलो आणि किल्ल्या घेऊन परत आलो. एकमेकांचे हात घट्ट धरून ठेवले होते. केवढा आधार वाटला. मनातली भेडसावणारी भुतं खरीच समोर उभी राहिली असती, तर काय करणार होतो आम्ही दोन चिमुरडी ?

आता या गोष्टीला साठ वर्षं उलटून गेली. अजून एकमेकांचा तसाच आधार वाटतो. कशाची भीती असते सगळ्या आयुष्याच्या वाटचालीत ? आपल्या आतमध्ये जर आधार सापडला, तर अंधारच नाहीसा होतो. मग खरंच भीती नाही राहात कशाची.

या आतल्या अंधाराकडे दुर्लक्ष करणाऱ्या लोकांना ईशावास्योपनिषदात आत्मघातकी असंच म्हटलं आहे आणि पुढे असंही सांगितलं आहे, की जिथे अगदी मिट्ट काळोख आहे, सूर्यच उगवणार नाही कधी अशा अंधाऱ्या लोकांत अशांची रवानगी होते. अंधाराची पुटं दिलेला काळोख असं त्याचं वर्णन केलेलं आहे.

ही अंधाराची पुटं आपणच देत राहतो. आपल्या भ्रामक आणि वेडगळ समजुती, सर्व काही आपल्याला समजलेलं आहे असा पोकळ गर्व, आवडणाऱ्या गोष्टींना चिकटून राहण्याची आणि दुःखापासून जितक्या लांब

पळता येईल तितक्या लांब पळण्याची प्रवृत्ती ही सारी अंधाराची पुटं आपण देत राहतो. आणि सरते शेवटी हा देह म्हणजेच मी आहे. तो कायम राहावा, नव्हे राहणारच आहे ही विद्वानांनासुद्धा न आवरता येणारी प्रबळ भावना, या साऱ्या अंधाऱ्या पुटांनी अंतरीचा ज्ञानदिवा झाकोळून जातो.

गांधारीने आपल्या चर्मचक्षूंवर पट्टी बांधून ठेवली होती. पण तिच्या मुलांनी ज्ञानचक्षूच बंद करून घेतले आणि साऱ्या जगावर अधिराज्य गाजवायचा प्रयत्न केला. पण ते कधीच शक्य होणार नाही. असल्या खटाटोपांनी अंधाराचीच सत्ता प्रबळ होते. आपली कधीच नाही. या अंधारातून मार्ग काढायला जे प्रयत्नशील आहेत, त्यांनी एकमेकांचे हात धरायचे असतात. मग त्यांची प्रकाशशक्ती वाढत जाते.

प्रकाशाला अंधाराचं भय बाळगायचं कारण नाही. अंधाराला प्रकाशावर कधीच जय मिळविता आलेला नाही. ज्ञानदेवांनी आणि त्यांच्या तिघा भावंडांनी भोवती दाटून आलेल्या काळोखाची कधीच तमा केली नाही. कारण त्यांच्या अंतरीच्या दिव्याचं तेज इतकं प्रखर होतं की आज आठशे वर्षांनंतरसुद्धा तो प्रकाश आपल्याला दिशा दाखवतो आहे, शीतल चांदणं होऊन !

**– भीष्मराज बाम**

**(‘मना सज्जना’ या पुस्तकातून)**